
धन्यवाद, फॉकर गुरुजी

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले



धन्यवाद, फॉकर गुरुजी

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले





आजोबांनी मधाची बाटली घरातल्या सगळ्यांना दिसेल अशी हातात धरली, त्यात एक चमचा घातला आणि एका लहानशा पुस्तकावर त्यातला मध शिंपडला.

छोटी नात नुकतीच पाच वर्षांची झाली होती.

“बाळ, इकडे ये,” आजोबा प्रेमाने म्हणाले. “तुझ्या आईसाठी, मामांसाठी आणि तुझ्या मोठ्या भावासाठी पण मी असंच केलं होतं, तेच आता तुझ्यासाठी करणार आहे.”

मग ते पुस्तक तिच्या हातात देऊन ते म्हणाले, “आता याची चव घे!”

मधात बोट घालून तिने ते आपल्या तोंडात घातले.

“कशी आहे चव?” आजोबांनी विचारले.

“गोड!” छोटीने उत्तर दिले.

यावर घरातल्या सर्वांनी एका आवाजात म्हटले, “हो, आणि ज्ञान देखील तसेच आहे. पण ज्ञान हे मध बनवणाऱ्या मधमाशीसारखं आहे. पुस्तकाच्या पानांमधून ते शोधावे लागते !”

आता तिला वाचायला मिळणार असाच याचा अर्थ होता हे छोटीच्या लक्षात आले. आता लवकरच ती वाचायला शिकणार होती.




घरातले शेंडेफळ असलेली त्रिशा पुस्तकांच्या प्रेमातच लहानाची मोठी होत होती. शाळेत शिक्षिका असलेली तिची आई तिला रोज रात्री पुस्तक वाचून दाखवायची. लाल केसांचा तिचा भाऊ शाळेतून येताना पुस्तके घरी आणायचा आणि तिला दाखवायचा. जेव्हा जेव्हा ती शेतावर जायची, तेव्हा आजी-आजोबा तिला शेकोटीजवळ बसून पुस्तके वाचून दाखवायचे.

पाच वर्षांची झाल्यावर ती जेव्हा बालवर्गात गेली, तेव्हा खरे तर तिला पुस्तक वाचायलाच शिकायचे होते. पलीकडच्या पहिलीच्या वर्गातील मुले पुस्तके वाचताना ती पाहत असे. वर्ष पूर्ण होण्यापूर्वी तिच्या वर्गातील काही मुलेही वाचू लागली होती. पण त्रिशाला मात्र वाचता येत नव्हते.

पण तिला शाळेत जायला खूप आवडत असे, तिथे ती छान चित्रे काढायची. जादूगार असल्याप्रमाणे रंगीत पेन्सिलीने ती इतकी सुंदर चित्रे कशी काढते ते बघायला बाकीची मुले तिच्याभोवती गोळा होत असत.

“तू पहिलीत गेलीस की तुला वाचता येईल,” तिचा भाऊ म्हणाला.






LOOK, LOOK.

पहिलीत गेल्यावर त्रिशा इतर मुलांबरोबर एका वर्तुळात बसली. सगळ्यांच्या हातात ‘आपला परिसर’ नावाचे पहिलीचे पुस्तक होते आणि त्यातून ते एक एक शब्द बनवून वाचत होते. “ह... हे..., प... ह... हा” शिक्षक ते पाहून मनाशीच हसले आणि अक्षरांतून “हे पहा” असा शब्द बनवून दाखवला.

पण त्रिशा जेव्हा पुस्तकाच्या पानाकडे पाहायची, तेव्हा तिला वेडेवाकडे आकार दिसायचे आणि ती त्यातून एखादा शब्द वाचू लागली, की इतर मुले तिला हसायची.

“त्रिशा, तू पुस्तकात काय पाहते आहेस?” ते तिला विचारायचे.

“मी वाचते आहे!” त्रिशा उत्तर द्यायची.

तिचे शिक्षक मग पुढच्या मुलाकडे वळायचे. तिची वाचायची पाळी आली की तिच्या शिक्षकांना तिला प्रत्येक शब्दात मदत करावी लागत असे. बाकीची मुले दुसरे आणि तिसरे पुस्तक वाचू लागली असली, तरी त्रिशा मात्र अजून ‘आपला परिसर’च वाचत होती.

त्रिशाला आता आपण सर्वांहून वेगळे असल्यासारखे वाटू लागले होते. आपण अगदी ‘ढ’ आहोत असे तिला वाटू लागले होते.





छोटीसाठी शब्द जसे अधिकाधिक कठीण होऊ लागले, तशी ती चित्रे काढण्यात अधिक वेळ रमू लागली. ते तिला फारच आवडत होते. नाही तर ती नुसतीच विचार करत बसू लागली. किंवा, शक्य होईल तेव्हा आजीबरोबर फिरायला जाऊ लागली.

एक दिवस ती आणि तिची आजी त्यांच्या शेतामागच्या वनात फिरायला गेल्या होत्या. संध्याकाळची वेळ होती. हवा छान होती. गवतातून नुकतेच काजवे बाहेर येऊ लागले होते.


चालता चालता त्रिशा म्हणाली, “आजी, मी ... जरा वेगळी आहे असं तुला वाटतं का?”

“अर्थात!” आजी म्हणाली. “सगळ्यांहून वेगळं असणं म्हणजे निसर्गाचा एक चमत्कार आहे. तुला हे छोटे छोटे काजवे दिसताहेत ना? त्यातील प्रत्येक काजवा निराळा आहे.”

“आजी, मी हुशार आहे असं तुला वाटतं का गं?” आपण हुशार आहोत असे त्रिशाला वाटत नव्हते.

आजीने त्रिशाला जवळ घेतले. “तू सर्वात हुशार, चपळ, आणि माझी लाडकी गोडुकली आहेस.”

छोटीला आजीच्या मिठीत असताना फारच छान वाटत होते. वाचनाचा विचार आता निघून गेला होता.





आकाशातले तारे म्हणजे आकाशाला पडलेली भोके आहेत आणि त्यातून स्वर्गातला प्रकाश येत असतो असे त्रिशाची आजी म्हणत असे... आणि ती म्हणायची की जिथून प्रकाश येतो त्या पलीकडल्या बाजूला ती कधीतरी जाणार आहे.

एक दिवशी रात्री गवतावर पडून त्या दोघी आकाशातून येणाऱ्या प्रकाशाची भोकं मोजत होत्या. “तुला माहित आहे का?” आजी म्हणाली, “आपण सगळेच केव्हातरी तिकडे जाणार आहोत. गवत घट्ट पकडून ठेव, नाहीतर जमिनीवरून उडशील आणि तू तिकडे जाशील!”

दोघी हसल्या आणि गवत घट्ट पकडून ठेवले.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी आजीच्या हातून गवत सुटले असणार, कारण लवकरच ती प्रकाश येत असलेल्या दुसऱ्या बाजूला गेली. आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनी आजोबांच्या हातातूनही गवत निसटले.

शाळेचा अभ्यास आता अधिकाधिक कठीण होत चालला होता.



वाचन ही एक शिक्षाच होऊ लागली होती. सू एलन किंवा टॉमी बॉब वर्गात सहजपणे वाचायला लागले की त्रिशा त्यांच्या डोक्याकडे लक्ष देऊन पाहत असे. कारण तिला वाटायचे की वाचताना त्यांच्या डोक्यात काहीतरी होत असणार, आणि ते तिच्या डोक्यात होत नसणार.

आणि आकडे वाचणे ही तर सर्वात कठीण गोष्ट होती. तिच्या बेरजा कधीच बरोबर येत नसत.

“बेरीज करण्यापूर्वी आकडे नीट एकाखाली एक लिही.” तिचे शिक्षक सांगायचे. पण त्रिशाने तसे केले की तिचे आकडे एखाद्या झुलत्या मनोऱ्यासारखे, केव्हाही खाली पडतील असे दिसायचे!

आपण अगदी ढ आहोत अशी आता तिची खात्रीच पटली होती.

एक दिवस तिच्या आईने सर्वांना सांगितले की तिला कॅलिफोर्नियात शिक्षिकेची नोकरी मिळाली होती. मिशिगनमधील शेतापासून हे फारच दूर होते.





आता जरी आजी-आजोबा नसले, तरीही छोटीला तिथून जायचे नव्हते. पण तिने विचार केला की कदाचित तिच्या नव्या शाळेतील मुलांना ती किती बुद्दू आहे हे कळणार नाही.

मग ती, तिच्या आई आणि भावाबरोबर त्यांच्या दोन रंगाच्या प्लिमथ गाडीतून कॅलिफोर्नियाला निघाली. त्यांना पोचायला तब्बल ५ दिवस लागले.






पण नव्या शाळेने काहीच फरक पडला नाही. वाचताना ती प्रत्येक शब्दावर अडखळत होती, “मा... मां ...मांजर प ... प... प... ळा... ले .” ती जरी आता तिसरीत असली, तरी बालवर्गाप्रमाणेच वाचत होती.

आणि वाचून झाल्यावर शिक्षक जेव्हा त्रिशाला काही प्रश्न विचारत, तेव्हा दरवेळी ती चुकीचेच उत्तर देत असे.

“ए बुद्दू” एक दिवस एका मुलाने तिला खेळाच्या मैदानावर हाक मारली आणि म्हणाला, “तू इतकी कशी गं बुद्दू आहेस?” त्याच्याजवळ उभी असलेली इतर मुले देखील हसू लागली.

त्रिशाचे डोळे भरून आले आणि कधी एकदा मिशिगन मधल्या आजी-आजोबांच्या शेतावर परत जाता येईल याची ती वाट पाहू लागली.





आता त्रिशाला शाळेत जावेसेच वाटत नव्हते. “माझा घसा दुखतो आहे” किंवा “आज माझं पोट दुखतंय” असे ती आईला सांगू लागली. ती स्वतःशीच अधिकाधिक विचार करत बसायची, खूप चित्रे काढायची आणि शाळा तिला आणखीच आवडेनाशी झाली.

त्रिशा जेव्हा पाचवीत गेली, तेव्हा शाळेत खूपच गडबड होती. शाळेत एक नवे शिक्षक आले होते. ते उंच आणि देखणे होते. त्यांचा रेघांचा कोट आणि राखी रंगाची पॅन्ट फारच शोभून दिसायची. त्यांचे कपडे नेहमीच फार छान असायचे.

स्टीव्ह जो, एलिस मारी, डेव्ही आणि मायकेल ली ही नेहमीची शिक्षकांची आवडती मुले त्यांच्याभोवती जमली. पण सुरुवातीपासूनच कुठली मुले गोड दिसतात, किंवा कोण सगळ्यात हुशार आहे किंवा कोणाला काय चांगले करता येते याने फॉकर गुरुजींना काहीच फरक पडत नव्हता.





Aa Bb Cc
148
X2
55
X3
Hi
I'm Mr. Falke


all children have
gifts, some open
them at
different
times.

त्रिशा जेव्हा चित्रे काढायची, तेव्हा फॉकर गुरुजी तिच्या मागे उभे राहायचे आणि तिला हळूच म्हणायचे, “हे फारच सुंदर आहे… तुझ्या हातात केवढी कला आहे, तुला माहित तरी आहे का?”

ते असे म्हणाले की जी मुले तिला नेहमी चिडवायची ती देखील वळून वळून तिची चित्रे पाहू लागायची. पण तरीही तिने चुकीचे उत्तर दिले की सगळे पूर्वीसारखेच तिला हसायचे.

मग एक दिवस, तिला उभे राहून वाचायचे होते, ते तर तिला मुळीच आवडत नसे. ‘शार्लोट्स वेब’ या धड्यातील एक पान ती अडखळत वाचत होती आणि बाकीची मुले मोठ्याने हसू लागल्यावर तिला पानावर काहीच नीट दिसेना.

चौकटीचा कोट आणि फुलपाखराचा टाय लावलेले फॉकर गुरुजी म्हणाले, “बास झालं! थांबा आता! तुम्हाला सगळ्यांना काय सर्व गोष्टी उत्तम करता येतात का, की तुम्ही तिला नावे ठेवता?”



त्यांनतर कोणीच तिला हसले नाही आणि एकट्या एरीक शिवाय कोणी तिची चेष्टाही केली नाही. संपूर्ण दोन वर्षे तो तिच्या मागल्या बाकावर बसत होता, पण तरीही ती त्याला मुळीच आवडत नव्हती. त्रिशाला त्याचे कारण माहित नव्हते.

तो वर्गाच्या दाराबाहेर तिची वाट पाहायचा आणि तिचे केस ओढायचा. खेळाच्या मैदानातही तिची वाट पाहायचा आणि ती आली की तिला 'बेडूक' म्हणून चिडवायचा.

कुठल्याही कोपऱ्याशी आली की तिथे एरीक लपलेला असेल अशी त्रिशाला भीती वाटायची. आणि फार एकटे वाटायचे.

फक्त फॉकर गुरुजी बरोबर असले की ती आनंदात असायची. ते तिला वर्गातला फळा पुसण्याचे काम द्यायचे. सर्वात चांगल्या विद्यार्थ्यांनाच हा मान मिळत असे. तिला एखादे उत्तर बरोबर आले की ते तिला शाबासकी द्यायचे, आणि जी मुले तिला चिडवत असतील, त्यांच्याकडे रागाने पाहायचे.





You don't count
NO HOPER
stupid
toad!
hey dummy
You're ugly!
dummie
dummy!
stupid
You don't belong
dumb
not one of us
UGLY
stupid



पण फॉकर गुरुजी त्रिशाशी जितके चांगले वागतील, तितकाच एरीक तिला अधिक त्रास द्यायचा. तो सगळ्या मुलांना खेळाच्या मैदानावर, कँटीनमध्ये नाहीतर बाथरूम मध्ये बोलावून सांगायचा की ती दिसली की एकदम बाहेर या आणि तिला ‘मूर्ख’, ‘कुरूप’, ‘वेडी’ म्हणून हाक मारा.

मग त्रिशाला ते खरेच वाटू लागले.

एकदा तिच्या लक्षात आले की छोटी सुटी सुरु होण्याआधीच ती जर परवानगी घेऊन बाथरूममध्ये गेली, तर त्या मोकळ्या वेळात तिला जिन्याच्या खाली लपता येई आणि सुटी संपेपर्यंत बाहेर यावे लागत नसे. जिन्याखालच्या अंधारात तिला अगदी सुरक्षित वाटत असे.






पण एक दिवस सुटीच्या वेळेत एरीक तिच्या मागोमाग तिच्या लपण्याच्या जागेत गेला. “तू काय आता चिचुंद्री झाली आहेस का?” असे चिडवत त्याने तिला बाहेर ओढले आणि “वेडी! वेडी!’ असे ओरडत तिच्याभोवती नाचू लागला.

त्रिशाने आपले डोके हाताने झाकून घेतले आणि अंग चोरून कोपऱ्यात जाऊन बसली. अचानक तिला कोणाची तरी चाहूल लागली. ते फॉकर गुरुजी होते.

ते एरीकला घेऊन कार्यालयात गेले. बाहेर आल्यावर त्यांना त्रिशा दिसली. “आता तुला त्या मुलाची काळजी करायचे काहीच कारण नाही.” त्यांनी त्रिशाला सांगितले.

“बाळ, तो तुला कशावरून चिडवत होता?”

“मला नाही माहित,” त्रिशा खांदे उडवून म्हणाली.



त्रिशाला वाचता येते असे फॉकर गुरुजींना वाटत असणार याची त्रिशाला खात्री होती. तिच्या शेजारची मुलगी काय वाचते ते ती पाठ करायला शिकली होती. किंवा फॉकर गुरुजींनी तिला एखादे वाक्य वाचताना मदत केली की ते म्हणतील तसेच ती म्हणायची. मग ते म्हणायचे, “छान”.

मग एक दिवस गुरुजींनी तिला शाळा सुटल्यावर फळे साफ करण्यासाठी मदत करायला थांबायला सांगितले. बोलता बोलता त्यांनी गाणी लावली आणि दोघे सॅन्डविच खात काम करू लागले.


अचानक ते म्हणाले, “आपण एक खेळ खेळूया! मी एखादे अक्षर मोठ्याने म्हणेन, आणि ते तू ओल्या फडक्याने फळ्यावर शक्य तितक्या लवकर लिहायचे.”


“ए” ते म्हणाले. तिने ओल्या फडक्याने “ए” काढला.

“आठ” ते म्हणाले. त्रिशाने ओल्या फडक्याने ८ चा आकडा लिहिला.

“१४... १३... डी ...एम... क्यू ” अशी खूप अक्षरे आणि आकडे ते म्हणत गेले. मग ते तिच्याजवळ गेले आणि दोघांनी मिळून फळ्याकडे पहिले.

फळ्यावर नुसतेच पाण्याचे डाग होते. आकडे आणि अक्षरे जशी दिसायला हवी होती तशी दिसत नव्हती हे त्रिशाच्या लक्षात आले होते. तिने हातातले फडके टाकून दिले आणि पळून जाऊ लागली.







पण फॉकर गुरुजींनी तिचा हात धरला आणि ते तिच्यासमोर खाली बसले. “हे बघ बाळ,” ते म्हणाले, “तुला वाटतं की तू बुद्दू आहेस, हो ना? खरंच आपण एकट्याच अशा आहोत म्हणून तुला भीती पण वाटत असेल ना?”

त्रिशा रडू लागली.

“पण हे बघ बाळ, तुला माहित नाही. बाकीच्या लोकांना आकडे आणि अक्षरे जशी दिसतात तशी ती तुला दिसत नाहीत. पण तरीही तू इतकी वर्षे शाळेत येत आहेस आणि आणि भल्या भल्या शिक्षकांना तू चकवलं देखील आहेस.” ते हसत म्हणाले, “त्यासाठी खूप हुशारी, चातुर्य, आणि शौर्य सुद्धा लागतं. ”

मग गुरुजी उभे राहिले आणि त्यांनी फळा साफ केला. “आता आपण हे सर्व बदलून टाकणार आहोत. तुला आता वाचता येणार आहे. माझी खात्री आहे.”



आता शाळा सुटल्यावर रोज ती फॉकर गुरुजी आणि वाचनाच्या शिक्षिका प्लेसी यांच्याबरोबर थांबू लागली. तिला माहित देखील नसलेल्या अनेक गोष्टी ती त्यांच्याबरोबर करू लागली. सुरुवातीला तिने वाळूत गोल काढले आणि मग ती फळ्यावर ओल्या फडक्याने गोल काढू लागली. दरवेळी सुरुवात डावीकडून करायची आणि उजवीकडे जायचे.

एक दिवशी त्यांनी फळ्यावर अक्षरे दाखवली आणि त्रिशाने ती अक्षरे ओळखून मोठयाने सांगितली. इतर काही दिवशी अक्षरे असलेले लाकडी ठोकळे घेऊन ती शब्द बनवायची. खूप वेगवेगळी अक्षरे आणि निरनिराळे शब्द... सगळे ती मोठ्याने वाचायची. त्याने तिला फार बरे वाटायचे.

पण ती जरी शब्द वाचायला लागली होती, तरी तिने अजून एकही पूर्ण वाक्य वाचले नव्हते. अजूनही आपण बुद्धू आहोत असेच तिला वाटत होते.

आणि मग एक दिवस-- या अभ्यासाला सुरुवात करून आता तीन महिने झाले होते की चार?-- फॉकर गुरुजींनी तिच्यासमोर एक पुस्तक ठेवले. तिने ते पूर्वी कधीच पाहिले नव्हते. मधल्याच एका पानावरचा एक परिच्छेद त्यांनी निवडला आणि त्याकडे बोट दाखवले.

जणू काही जादू केल्याप्रमाणे, किंवा तिच्या मेंदूत एकदम प्रकाश पडल्याप्रमाणे पुस्तकाच्या पानावरील ते शब्द आणि वाक्ये तिला समजू लागली. असे पूर्वी कधीच झाले नव्हते. “ती ...त्यांना... घेऊन... चालत... निघाली...”
हळू हळू तिने पूर्ण वाक्य वाचले. मग आणखी एक... आणखी एक...
अखेर तिचा पूर्ण परिच्छेद वाचून झाला. आणि तिला तो पूर्णपणे समजला होता.

फॉकर गुरुजी आणि मिस प्लेसीच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते,
पण त्रिशाचे त्यांच्याकडे लक्षच नव्हते.








त्या दिवशी त्रिशा धावत पळत घरी आली, दम खायला देखील थांबली नाही. पायऱ्या चढून घराचे दार उघडेच टाकून पळतच ती जेवायची खोली ओलांडून थेट स्वयंपाकघरात शिरली. कपाटावर चढून तिने मधाची बाटली काढली.

मग दिवाणखान्यात जाऊन पुस्तकाच्या कपाटातून तिने एक पुस्तक काढले- खूप वर्षांपूर्वी तिच्या आजोबांनी तिला दिले होते, तेच ते पुस्तक होते. त्याच्यावर तिने थोडासा मध टाकला आणि त्याची गोडी चाखली. ती स्वतःशीच म्हणाली, “मध गोड आहे, तसेच ज्ञानही आहे. पण ज्ञान हे मध बनवणाऱ्या मधमाशीसारखे आहे, पुस्तकाच्या पानांतून त्याला शोधावे लागते!”

मग ते पुस्तक आणि मधाची बाटली तिने आपल्या छातीशी घट्ट धरून ठेवली. तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते, पण ते दु;खाचे अश्रू नव्हते, आज ती फार आनंदात होती, फार म्हणजे फारच!



राहिलेले वर्ष या छोट्या मुलीसाठी एक मोठीच शोधयात्रा होती आणि तो एक थरारून टाकणारा अनुभवही होता. आता तिला शाळा आवडू लागली होती. हे मी खात्रीने सांगू शकते कारण ती लहान मुलगी म्हणजेच मी, पॅट्रिशिया पोलको.

त्यानंतर फॉकर गुरुजी मला जवळ जवळ ३० वर्षांनी एका विवाह समारंभात भेटले. मी त्यांच्याकडे गेले आणि माझे नाव सांगितले. प्रथम त्यांना एकदम आठवेना. मग मी त्यांना सांगितले की अनेक वर्षांपूर्वी त्यांनी माझे आयुष्यच बदलून टाकले होते.

त्यांनी प्रेमाने मला जवळ घेतले आणि विचारले की मी आता काय करते. मी उत्तर दिले, “फॉकर गुरुजी, आता मी मुलांसाठी पुस्तके, चित्रे असलेली पुस्तके लिहिते... आणखी काय हवे! गुरुजी, मनापासून धन्यवाद!”



